# सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
## नविन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१

कार्यालय :०२०-२६१२२५००,२६१२७२१७ फॅक्स : (०२०) २६१३३०८२ E-Mail : comm_audit@rediffmail.com


---

जा.क्र.सआ/अंनिलेप/नामतालिका /क१८/९५९/२०१४
दिनांक :- १० /१० /२०१४

## परिपत्रक

**संदर्भ:**- १. शासन पत्र क्र. सगृयो-२०१३/प्र.क्र.६४३/प्र.क्र.५५/१४-स, दिनांक १०/०९/२०१४
२. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.सआ/अनिलेप/लेप/सहकारी संस्था/नामिका/८७४/२०१४, दिनांक १२/०९/२०१४
३. या कार्यालयाचा आदेश क्र. सआ/अनिलेप/नामतालिका/आदेश/कक्ष-१८/९२५/२०१४, दिनांक २९/०९/२०१४

उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या आदेशानुसार लेखापरीक्षकाची नामतालिका महासहकार या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली होती. या ऑनलाईन प्रक्रीयेमध्ये लेखापरीक्षकांची नावे काही तांत्रिक व परिपूर्ण माहिती अपलोड न केल्याने असे अर्ज अस्विकृत केलेले आहेत. अशा लेखापरीक्षकांच्या बाबतीत ऑनलाईन अर्जातील तृटीची पूर्तता करण्यासाठी ज्यांनी या पूर्वी ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. त्यांनी पून्हा आपले पूर्वीचे आवेदन पत्रात आवश्यक व परिपूर्ण दुरूस्त्या करण्यासाठी दिनांक ११/१०/२०१४ ते १६/१०/२०१४ या कालावधीमध्ये ऑनलाईन अर्जामध्येच दुरूस्ती करावी. यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१**. ज्यांनी रू. १०० चे बॉड पेपर न देता किंवा नोटरी न करता साध्या कागदावर विहीत नमुन्यात हमीपत्र लिहून दिले असेल असेचे अर्ज स्विकारले जातील.

**२. अनुभव-** अ. लेखापरीक्षणाच्या अनुभवाबाबत जिल्हा विशेष लेखापरीक्षक, जिल्हा उपनिबंधक, किंवा संस्थेला अहवाल दाखल केल्याची पोच असल्यास किंवा नमुना नं.-१ असल्यास जिल्हा उपनिबंधक/जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी खात्री करून स्विकृत करावे. प्रत्येक वर्षाचा १ लेखापरीक्षण अहवाल विचारात घेतला जाईल. एकाच अहवालात २ किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी असला तरी १ वर्षाचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

ब. प्रमाणित लेखापरीक्षकांच्या बाबतीत अनुभवाचा पुरावा अपलोड केलेला असावा त्यासाठी सनदी लेखापाल यांचेकडे जीडीसी ॲन्ड ए पास झाल्यानंतर सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणाचा अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र अपलोड करावे.

**३**. सनदी लेखापालाच्या बाबतीत वैयक्तीक सनदी लेखापाल म्हणून अर्ज केला असल्यास त्याला फर्म मधून अर्ज करता येणार नाहीत.असे अर्ज अस्विकृत केले जातील. तर पार्टनरशीप फर्मबाबत सर्व पार्टनरचे COP अपलोड करणे आवश्यक आहे.

अनुभवाच्या बाबतीत सतत व समवर्ती व अंतर्गत लेखापरीक्षण ग्राह्य धरले जाईल. मात्र त्यासाठी संस्थेला दिलेल्या अहवालाची पोच अपलोड करणे आवश्यक आहे.

**४. शासकीय लेखापरीक्षक:**

१)सेवेत असलेले शासकीय लेखापरीक्षकांनी सेवेत असलेच्या कालावधी बाबत कार्यालय प्रमूख यांचे प्रमाणपत्र घ्यावे.(शासकीय सेवेत सरळ भरतीने दाखल झाले असल्यास )

२) सहकार खात्यातील निवृत्त कर्मचा-यांचे बाबतीत पदवी परिक्षा व HDCM किंवा GDC&A परिक्षा पास असणे आवश्यक आहे.

३) सहकार खात्याच्या प्रशासन विभागातील सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना किमान तीन वर्षे अंतर्गत किंवा सतत समवर्ती लेखापरीक्षणाचा अनुभव असावा.

**५**. छायाचित्रा अभावी अस्विकृत झालेल्या अर्जदारानी पासपोट साईज कलर फोटो अपलोड करावा.

**६**.ऑनलाईन अर्ज व संबंधित जोडपत्रे PDF फॉरमॅटमध्ये अपलोड करण्याची दक्षता घेण्यात यावी.

७.sahakarayukta.maharashtra.gov.in वर लेखापरिक्षकांची यादी दर्शविली असून त्यामध्ये नविन सहकार नियम (Rule) नुसार पुढील प्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.त्यानुसार बदल करण्यात यावा .

| अ.क्र. | वर्ग | सध्याची वर्गवारी | नवीन वर्गवारी | बदल करावयाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग अ | उपवर्ग-१: सनदी लेखापालाची फर्म | उपवर्ग-१:सनदी लेखापालाची फर्म | बदल नाही |
| | | उपवर्ग-२:सनदी लेखापाल | उपवर्ग-२:सनदी लेखापाल | |
| | | उपवर्ग-३:सहनिबंधक सहकारी संस्था | उपवर्ग-३: सहनिबंधक सहकारी संस्था | |
| | | उपवर्ग-४: विशेष लेखापरिक्षक वर्ग १ | उपवर्ग-४: विशेष लेखापरिक्षक वर्ग १ | |
| २ | वर्ग –ब | उपवर्ग -१ :सनदी लेखापाल | उपवर्ग -१ :सनदी लेखापाल | बदल नाही |
| | | उपवर्ग -२ : विशेष लेखापरिक्षक वर्ग -२ | उपवर्ग -२ : विशेष लेखापरिक्षक वर्ग -२ व लेखापरिक्षक श्रेणी-१ | उपवर्ग २ व उपवर्ग -३ एकत्र करुन उपवर्ग-२ दर्शवावी |
| | | उपवर्ग -३:लेखापरिक्षक श्रेणी १ | | |
| | | उपवर्ग ४:प्रमाणित लेखापरिक्षक | उपवर्ग ४:प्रमाणित लेखापरिक्षक | उपवर्ग ४ ची यादी उपवर्ग ३ म्हणून दर्शवावी |
| ३. | वर्ग-क | उपवर्ग-१: लेखापरीक्षक श्रेणी २ | उपवर्ग-१: प्रमाणित लेखापरीक्षक | उपवर्ग क-१ व क-२ हे एकत्र करुन उपवर्ग क-२ दर्शवावे व उपवर्ग क-३ मधील लेखापरीक्षक हे उपवर्ग क-१ मध्ये दर्शविणे |
| | | उपवर्ग-२ : उपलेखापरीक्षक | | |
| | | उपवर्ग-३ : प्रमाणित लेखापरीक्षक | उपवर्ग-२ : लेखापरीक्षक श्रेणी-२ व उपलेखापरीक्षक | |

**ऑनलाईन अर्ज दुरूस्तीचा कालबध्द कार्यक्रम खालीलप्रमाणे.**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज दुरूस्ती करण्याचा कालावधी | दिनांक ११/१०/२०१४ ते १६/१०/२०१४ |
| २ | दुरूस्त केलेल्या ऑनलाईज अर्जाची छाननी | दिनांक १७/१०/२०१४ ते १८/१०/२०१४ |
| ३ | सहकार आयुक्त स्तरावर तपासणी | दिनांक १९/१०/२०१४ ते २१/१०/२०१४ |
| ४ | पात्र लेखापरीक्षकांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. | दिनांक २२/१०/२०१४ |

**सहकार आयुक्त व निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.**

प्रत:

१. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सर्व
२. जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ सहकारी संस्था सर्व.